# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ०५/०१/२०२५

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी वर्चस्व निर्माण करून दहशत माजविणाऱ्या ६ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावला आहे

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात कळमेश्वर पोलीसांनी **वर्चस्व निर्माण करून दहशत माजविणाऱ्या आरोपीतांचा** टोळी प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण ६ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे १) हरीश मोहन ग्वालवंशी, वय ५० वर्षे रा. मकरधोकळा ता.जि. नागपुर हा असुन टोळी सदस्य आरोपी २) रोशन बबन यादव, वय ३२ वर्षे, रा. मकरधोकळा ता. जि. नागपुर ३) आशुतोष शैलेश ग्वालवंशी, वय २६ वर्षे, रा.मकरधोकळा ता.जि.नागपुर ४) अनिकेत अनिल उईके, वय २८ वर्षे, रा.मकरधोकळा ता.जि. नागपुर ५) आशिष विष्णु गिरी, वय ३४ वर्षे, रा.गंगा नगर,काटोल रोड, नागपुर ६) राजेश्वर उर्फ काल्या किसनजी सोनारे, वय ४५ वर्षे रा. मकरधोकडा ता. जि.नागपुर हे आहेत.

नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख हरीश मोहन ग्वालवंशी हा नेहमी एकटयाने किंवा साथीदारांसह गुन्हे करीत आलेला आहे. नमुद टोळी प्रमुख व टोळीतील सदस्य हे आर्थिक फायदयासाठी तसेच परिसरात त्यांचे टोळीची दहशत व वर्चस्व पसरविण्यासाठी खुन, खुनाचा प्रयत्न करने, खंडणी, अपहरण, प्राणघातक शस्त्र बाळगणे, गैरकायदयाची मंडळी जमविणे तसेच गंभीर दुखापत पोहचवून शिवीगाळ करणे, जिवे मारण्याची धमकी देणे, अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतात. सदर टोळी प्रमुख आाणि सदस्यांवर नागपूर ग्रामीण, नागपूर शहर या जिल्हयामध्ये सन २०१७ चे पुर्वी पासुन अनेक गुन्हे नोंद आहेत. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी

वेळोवेळी त्याचेवर गुन्हे नोंद करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. टोळी प्रमुख आरोपी यांचेवर पो.स्टे गिट्टीखदान, पो.स्टे सदर, पोलीस स्टेशन सिताबर्डी येथे,पोलीस स्टेशन कळमेश्वर नागपुर ग्रामीण येथे ११ गुन्हयांची नोंद आहे. तसेच टोळीचे इतर सदस्यांवर सुध्दा नागपुर शहर आणि ग्रामीण येथे अनेक गुन्हे नोंद आहे. त्यामुळे नमुद ६ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावण्यात आला आहे.

पुण्य नगरी

# कळमेश्वरच्या ग्वालबंशी टोळीला 'मोक्का'चा दणका

## नागपूर ग्रामीण पोलिसांचा गुन्हेगारांवर 'सर्जिकल स्ट्राइक'

**कळमेश्वर (नागपूर) : नागपूर ग्रामीण पोलिसांनी कळमेश्वर परिसरात दहशतीचे वर्चस्व निर्माण करणाऱ्या सहा आरोपींच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का)अंतर्गत कारवाई केली. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी जगतात खळबळ उडाली आहे.**

या टोळीचा प्रमुख हरीश मोहन ग्वालबंशी (५०, रा. मकरधोकडा) असून त्याच्यासह रोशन बबन यादव (३२), आशुतोष शैलेश ग्वालबंशी (२६), अनिकेत अनिल उईके (२८), आशिष विष्णू गिरी (३४) आणि राजेश्वर उर्फ काल्या सोनारे (४५) अशी मोक्का लागलेल्या आरोपींची नावे आहेत. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी या टोळीने जुन्या वादातून आरीफ लतीफ शेख याला विसावा बारसमोर बेदम मारहाण केली होती. त्यानंतर कारमध्ये अपहरण करून त्याला फ्रेण्ड्स कॉलनी येथे नेले. या प्रकरणाचा सखोल तपास केला असता ही टोळी आर्थिक फायद्यासाठी खून, खंडणी आणि अपहरणासारखे गुन्हे संघटितपणे करत असल्याचे उघड झाले. टोळीप्रमुख हरीश ग्वालबंशीवर नागपूर शहर व ग्रामीणमध्ये ११ गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली कळमेश्वर पोलिसांनी मोक्काचा प्रस्ताव विशेष पोलीस महानिरीक्षकांकडे सादर केला होता. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने आता या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणे सोपे झाले आहे. ग्रामीण पोलिसांनी घेतलेल्या भूमिकेमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

Nagpur Edition
Jan 08, 2026 Page No. 09
Powered by: erelego.com

# 6 आरोपियों की गैंग पर लगा मकोका

## हरीश और साथियों पर कार्रवाई

नागपुर, कार्यालय प्रतिनिधि. नागपुर ग्रामीण पुलिस ने क्षेत्र में दहशत और वर्चस्व कायम करने वाली 6 आरोपियों की संगठित आपराधिक गैंग के खिलाफ महाराष्ट्र संगठित अपराध नियंत्रण अधिनियम, 1999 (मकोका) के तहत कड़ी कार्रवाई की है. यह कार्रवाई पुलिस अधीक्षक हर्ष पोद्दार और अपर पुलिस अधीक्षक अनिल म्हस्के के मार्गदर्शन में

**कलमेश्वर पुलिस द्वारा की गई :** इस गैंग का सरगना मकरधोकड़ा, तहसील कलमेश्वर निवासी हरीश मोहन ग्वालबंशी (50) बताया गया है. गैंग के अन्य सदस्यों में रोशन बबन यादव, आशुतोष शैलेश ग्वालबंशी, अनिकेत अनिल उईके, आशीष विष्णु गिरी और राजेश्वर उर्फ काल्या सोनारे शामिल हैं. सभी आरोपी नागपुर जिले के निवासी हैं.

**अपहरण और हत्या का प्रयास :** 23 नवंबर 2025 की रात कलमेश्वर स्थित विसावा बार के सामने पुराने विवाद के चलते आरोपियों ने आरिफ लतीफ शेख नामक युवक पर लाठी, पत्थर व लाथ घूसों से हमला किया. इसके बाद उसे कार में जबरन बैठाकर अपहरण कर मारपीट की गई. इस मामले में कलमेश्वर थाने में गंभीर धाराओं के तहत अपराध दर्ज कर सभी आरोपियों को गिरफ्तार किया गया. जांच में सामने आया कि यह अपराध संगठित रूप से किया गया था. गैंग लंबे समय से आर्थिक लाभ और क्षेत्र में दहशत फैलाने के उद्देश्य से हत्या के प्रयास, अपहरण, जबरन वसूली और गंभीर हमलों जैसे अपराधों में लिप्त रही है. गैंग सरगना और उसके साथियों पर नागपुर शहर व ग्रामीण जिलों में पहले से कई गंभीर मामले दर्ज हैं.

### मकोका की धाराएं लागू

आरोपियों की निरंतर आपराधिक गतिविधियों को देखते हुए कलमेश्वर पुलिस ने मकोका के तहत प्रस्ताव तैयार कर वरिष्ठ अधिकारियों के माध्यम से विशेष पुलिस महानिरीक्षक, नागपुर परिक्षेत्र को भेजा. प्रस्ताव को मंजूरी मिलने के बाद इस प्रकरण में मकोका की धाराएं जोड़ी गईं.